# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 05/06/2023 (सोमवार) दुपार

## घरफोडी

**पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत ०८ किमी अंतरावर मौजा मांगरूळ किर्ती बार भिवापुर येथे दिनांक ०३/०४/२०२३ चे २२.३० वा. ते दिनांक ०४/०६/२०२३ चे ०७.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– विशाल किर्तीकर कामडी, वय २३ वर्ष, रा. गिरडकर ले आउट उमरेड जि. नागपुर यांचे बारचे समोरचे शटर व चॅनल गेटचा दरवाजा तोडुन आत प्रवेश करून फिर्यादीचे बारमधील १) रॉयल स्टॅग विस्की ९० एम. एल. च्या चार पेट्या एकूण ४०० नग प्रती बॉटल ९५/– रू. प्रमाणे एकूण किंमती ३८,०००/–रू. २) ऑफिसर चॉइस ब्ल्यु प्युअर ग्रेन विस्की १८० एम. एल च्या दोन पेट्या एकूण ९६ नग प्रती बॉटल १५० रू. प्रमाणे एकूण किमती १४,४००/– रू. ३) ऑफिसर चॉइस ब्ल्यु प्युअर ग्रेन विस्की ९० एम. एल च्या एकूण ६५ नग प्रती बॉटल ८० रु. प्रमाणे एकूण किंमती प्रमाणे एकूण किमती. ५२००/–रू. ४) रॉयल चॅलेंज विस्की ९० एम. एल. च्या एकूण ९९ नग प्रती बॉटल ९५ रु. प्रमाणे एकूण किमती ९४०५/– रू. ५) रॉयल चॅलेंज विस्की १८० एम. एल. च्या एकुण ३६ नग प्रती बॉटल १८० रू., प्रमाणे एकूण किमती ६४८० रू. असा एकूण ७३,४८५/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. विवेक सोनवणे पोस्टे उमरेड मो. नं. ८८०५७३०३६२ हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील घोगली शिवार येथे दिनांक ०२/०६/२०२३ चे १६.०० वा. ते दिनांक ०३/०६/२०२३ चे १७.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– नितेश पंढरी तकीत, वय ३२ वर्ष रा. बोरगाव, फेटरी ता. जि. नागपूर यांचे मौजा घोगली शिवारातील शेतातील विहिरीवरील ०३ एच. पी. चे मोटारपंप किंमती ४०००/– रू. व पि. व्हि. सी पाईप २० फुट पांढऱ्या रंगाचा किंमती ३०००/– रू. असा एकूण ७०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार करपाते मो. नं. ९९६०६८२४७८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**